**सरकारतर्फे साक्षीदार क्र. १** **संं.फौ.ख.क्र. ६९२/२०२४**

महाराष्ट्र शासन वि. भारत

**नि.क्र. १३ खाली**

मी सत्य प्रतिज्ञेवर कथन करतो की,

| | | |
|---|---|---|
| माझे नाव | – | सुरेश खुषालराव गहाने, |
| वय | – | ६५ वर्षे, |
| व्यवसाय | – | शेती, |
| राहणार | – | खेडी –खुर्द, ता. नरखेड, जि. नागपुर |

**सरतपास सहाय्यक सरकारी अभियोक्ता श्री. व्ही. यु. मिरचे यांच्यामार्फत शपथेवर सुरुः–**

दि. १४/०७/२०२४ रोजी पोलीसांनी मला पंचनाम्यासाठी कोणतेही समन्स किंवा सुचनापत्र दिले नव्हते. आता मला दि. १४/०७/२०२४ रोजीचे पंचनाम्यासाठीचे सुचनापत्र दाखविण्यात येत आहे. त्यावरती माझी सही आहे. त्यातील मजकुराबाबत मला काहिही माहिती नाही. शेतातुन येत असतांना पोलीसांच्या सांगण्यावरुन मी त्यावर सही केली. त्यास सहीपुरता **निशाणी १९** देण्यात येत आहे. आता मला दि. १४/०७/२०२४ रोजीचे घटनास्थळ पंचनामा दाखविण्यात येत आहे. त्यावरती माझी सही आहे. त्यातील मजकुराबाबत मला काहिही माहिती नाही. शेतातुन येत असतांना पोलीसांच्या सांगण्यावरुन मी त्यावर सही केली. त्यास सहीपुरता **निशाणी २०** देण्यात येत आहे. पोलीसांनी माझ्याकडे कोणतीही चौकशी केली नाही व माझे बयान नोंदविले नाही. मी आरोपीला ओळखतो. तो माझ्या गावातील रहिवाशी आहे.

**(सदर साक्षीदार अभियोगपक्षास सहकार्य करीत नसल्याने विद्यमान सहाय्यक सरकारी अभियोक्तांनी सदर साक्षीदार उलटतपासणीची परवानगी मागितली. साक्षीदारास उलटतपासणीमध्ये विचारल्या जाणारी प्रश्न विचारण्याची परवानगी *भारतीय पुरावा कायदा चे कलम १५४ / भारतीय साक्ष अधिनियम, २०२३ चे कलम १५७* प्रमाणे देण्यात येत).**

२. हे म्हणणे खरे नाही की, दि. १४/०७/२०२४ पोलीसांनी मला पंचनाम्यासाठी खेडी गावात आमरस्त्यावर बोलाविले होते. हे म्हणणे खरे नाही की, पोलीसांनी माझ्या समक्ष घटनास्थळ पंचनामा तयार केले. मी दुसरा पंच दिपक ठाकरे यास मी ओळखतो. हे म्हणणे खरे नाही की, पंचनाम्याच्या वेळी तो सुध्दा माझ्या सोबत होता. हे म्हणणे खरे

नाही की, पोलीसांनी माझे बयान नोंदविले होते. आता मला बयानातील अधोरेखांकित **भाग अ** वाचून दाखविण्यात येत आहे. तो मी पोलीसांना सांगितलेला नव्हता. ते पोलीसांनी का लिहिले हे मी सांगु शकत नाही. हे म्हणणे खरे आहे की, आरोपी माझ्या ओळखीचा आहे. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी माझा ओळखीचा असल्यामुळे व त्याला वाचविण्यासाठी मी आज रोजी न्यायालयात उपस्थित राहुन खोटी साक्ष देत आहे.

**सरतपास पुर्ण.**

**आरोपीतर्फे विधीज्ञ श्री. एस. एस. मानकर यांच्यामार्फत उलटपासः–**

**उलटतपास नाकारले.**

**फेरतपास नाही.**

माझे समक्ष,

स.सा.वा.दा.ब.अ.क.केले.

**(रोहन विजयकुमार थाईल)**

न्यायदंडाधिकारी, प्रथम वर्ग, नरखेड

न्यायदंडाधिकारी, प्रथम वर्ग,
नरखेड, नागपूर.

**दिनांकः १०/०३/२०२६.**

**दिनांकः १०/०३/२०२६**

माझे सरतपासणी व उलटतपासणी चे पान नं. 01 ते 02 मला वाचून दाखविले व ते माझ्या सांगयाप्रमाणे आहे. व **Explanation V**, **Paragraph No**. 16, **Chapter VI of Criminal Manual** प्रमाणे मला त्याचे विनामुल्य खरी नक्कल मिळालेली आहे.

साक्षीदाराची सही
(सुरेश खुषालराव गहाने)

विशेष सहाय्यक सरकारी अभियोक्ता
(श्री. व्ही. यु. मिरचे)